# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

04 Mar 2025

दैनिक एकमेव विचारपत्र

महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000

@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# लायब्ररीचे नॅक मूल्यांकनामध्ये योगदान या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

✲ महाराष्ट्र न्यूज नेटवर्क पाटण, दि. ३ मार्च : सातान्यास पाणीपुरवठा करणाऱ्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या परीस स्पर्श योजनेतून लायब्ररीचे नॅक मूल्यांकनामध्ये योगदान या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन बाळासाहेब देसाई कॉलेज,पाटण मध्ये दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले होते.या चर्चासत्राचे उद्घाटन व बीजभाषण डॉ. धनंजय सुतार,इनचार्ज डायरेक्टर,बॅ.बाळासाहेब खर्डेकर नॉलेज रिसर्च सेंटर,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.



याप्रसंगी दोन सत्रामध्ये चर्चासत्र घेण्यात आले.पहिल्या सत्राच्या प्रमुख मार्गदर्शिका यांनी नॅक मूल्यांकनामध्ये ग्रंथालय सेवकांची जबाबदारी या विषयवार विस्तृतपणे मार्गदर्शन केले.व दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. शिवाजीराव कांबळे वाई यांनी नॅक मूल्यांकनामध्ये ग्रंथालयाचे महत्व व जबाबदारी यावर मार्गदर्शन केले.

या राष्ट्रीय चर्चासत्राचे अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण होते.प्रमुख उपस्थिती डॉ.एस.डी.पवार,आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.एच.व्ही. काटे व संजय इंगवले, प्रा. ए.व्ही. देशपांडे हे होते.सदर चर्चासत्रासाठी सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ७५ महाविद्यालयीन ग्रंथपाल व पाटण तालुक्यातील २२ सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल यांनी सहभाग घेतला होता.

तसेच नॅक मूल्यांकनामध्ये कामाची पूर्वतयारी, ग्रंथालयाचे आधुनिकीकरण, नॅक दहा क्रायटेरियामध्ये झालेले बदल, महाविद्यालय ग्रंथालयाबरोबरच सार्वजनिक ग्रंथालयाच्या असणाऱ्या अडी अडचणी दूर व्हाव्या व महाविद्यालयीन व सार्वजनिक ग्रंथालयामध्ये समन्वय राहावा यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न करावेत आदी विषयावर चर्चासत्र झाले.

राष्ट्रीय चर्चासत्र पार पाडण्यासाठी ग्रंथपाल अनिल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनायक राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे आभार डॉ. प्रशांत फडणीस यांनी मानले. सदर चर्चासत्रासाठी विविध महाविद्यालयातील ग्रंथपाल व